# एमएमआरसीएलकडून जागतिक भुयारीकरण दिवस साजरा

**मुंबई** : सेंट बार्बर यांना भुयारीकरणाचे संत म्हणून ओळखण्यात येत असल्याने त्यांच्या स्मरणार्थ जागतिक पातळीवर साजरा करण्यात येणारा भुयारीकरणाचा दिवस एमएमआरसीएलनेही साजरा केला आहे.

यंग ग्रुप ऑफ इंटरनॅशनल टनेलिंग अँड अंडरग्राउंड स्पेस असोसिएशनद्वारे भारतासह २८ राष्ट्रीय तरुण सदस्य गटांसोबत नुकताच २४ तासांच्या ऑनलाईन बैठकीमध्ये जागतिक भुयारीकरण दिवस साजरा करण्यात आला. जगभरात राबवल्या जाणाऱ्या भुयारीकरणाच्या प्रकल्पांमध्ये स्वारस्य निर्माण करणे आणि सर्व वयोगटातील विद्यार्थ्यांना आणि सर्वसामान्यांना याविषयी प्रोत्साहन देण्याच्या हेतूने हा दिवस साजरा केला जातो. टनेलिंग असोसिएशन ऑफ इंडियाने देखील हा दिवस नवी दिल्लीतील टायच्या कार्यालयात जमलेल्या तरुण टनेलर्सनी एकत्रित येत साजरा केला. या वेळेस मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडचे प्रकल्प संचालक एस. के. गुप्ता यांनी 'अंडरग्राऊंड स्पेसचा उपयोग आजच्या काळाची गरज' या विषयावर व्याख्यान दिले.

इंटरनॅशनल टनेलिंग अँड अंडरग्राऊंड स्पेस असोसिएशनच्या तरुण आणि उत्साही प्रेक्षकांसमोर मुंबईसारख्या दाट लोकसंख्येच्या शहरामध्ये भुयारीकरणाच्या आव्हानावर चर्चा करण्यात आली. तसेच नदी, ऐतिहासिक व उंच इमारती, उड्डाणपूल, मेट्रो लाईन आणि रेल्वे लाईन, भूमिगत मेट्रो भुयारीकरण यावरही चर्चा करण्यात आल्याचे गुप्ता यांनी स्पष्ट केले.